महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३,
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/ एनजीसी/फार्मसी/मान्यता/(८७/२०२१)/ दिनांक: 23 MAR 2022

प्रति,
प्राचार्य,
पुणे जिल्हा शिक्षण संघाचे
शेठ गोविंद रघुनाथ साबळे फार्मसी कॉलेज,
मु.पो.सासवड, ता.पुरंदर, जि. पुणे ४१२३०१

(डीटीई कोड -६३७२)

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर विद्यमान संस्थेत सद्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ सुरू करण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०२१/प्र.क्र.११०/तांशि ४, दि. २९ जुलै, २०२१

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शै.व.२०२१-२२ पासून कायम विना-अनुदान तत्वावर विद्यमान संस्थेत सद्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | एम.फार्म.फार्मास्युटिकल केमिस्ट्री | ०६-१५ |
| २ | एम.फार्म.फार्मास्युटिक्स | १०-१५ |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र “अ” व “ब” या संचालनालयास सादर केलेले आहे.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे विद्यमान संस्थेत सद्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ सुरु करण्यास व संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयी सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.



POONA DISTRICT EDUCATION ASSOCIATION'S
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy, Saswad
Inward Letter No:- 1819
Date:- 24/3/2022

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या सांकेतांक क्रमांक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, या संचालनालयाने, **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे** व फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन /फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, यांना राहतील.

५. वरील अभ्यासक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी वेळोवेळी विहित आणि निर्गमित करण्यात आलेले नियम, आदेश, परिनियम, अध्यादेश इत्यादींमधील तरतूदींच्या अधीन राहून दिलेल्या पहिल्या वेळेच्या मान्यतेच्या आधारे मान्यता देण्यात येत असून याबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तूत संस्थेने आपल्या कार्यालयाकडे नोंदणी केल्याशिवाय प्रस्तूत अभ्यासक्रमांस प्रवेश करण्यात येऊ नयेत.
२. मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४. कार्यासन क्र. २ अ मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कायांसन क्र.३ आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्तीस.

\\192.168.1.9\Desk2\Approval Process 2021-22\Final Order 2021-22\Pci\Final Order_2021-22.Docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक : २/एनजीसी/एम.फार्म/मान्यता/२००७/ ७२६
दिनांक : 13 AUG 2007

प्रति,
प्राचार्य,
पुणे शिक्षण संस्थेचे
सेठ गोविंद रघुनाथ साबळे
कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड,
**पुणे ४१२ ३०१.**

विषय : शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन **एम.फार्म (फार्मकोलॉजी)** हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,क्रमांक-टीईएम-२००७/(२८३/०७)/ तांशि-१, दिनांक ३० जून, २००७.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून विना-अनुदान तत्वावर **एम.फार्म (फार्मकोलॉजी)** हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | **एम.फार्म (फार्माकोलॉजी)** | १० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून एम.फार्म हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सन २००७-०८ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.
२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१ अ,दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील
३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावेत व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,पुणे विद्यापीठ व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास संबंधी संस्था जबाबदार राहील.

Original M.Pharm. Pharmacology File
VRP/KSC TNA
14/8/07

Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy
Inward Letter No. 173
Date 14/8/07

C:\Degree Folder 2007-08\M. pharmacy.doc.yele